## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३८७३ + ३८७४ / २०२४ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| महेश यशवंत काशीद | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कराड, जि. सातारा | तहसिलदार, तहसिल कार्यालय कराड, जि. सातारा |

( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १०.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केली आहेत. व्दितीय अपिले दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती देण्यास टाळाटाळ " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २७.१०.२०२२ | दि. २१.०३.२०२२ रोजी व दि. ०१.०७.२०२२ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही संदर्भात एकूण ५ मुद्यांची माहिती. |
| १४.११.२०२२ | उच्च न्यायालय सो. मुंबई यांचे गायरान बाबत आदेशाचे अंमलबजावणी बाबत एकूण ४ मुद्यांची माहिती. |

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांचा दि. २७.१०.२०२२ रोजीचा माहिती अर्ज उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड यांचेकडून दि. ०२.११.२०२२ रोजी तहसिल कार्यालय, कराड

यांचेकडे वर्ग झाला आहे. तद्नंतर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कराड यांनी दि. १५.११.२०२२ रोजीच्या पत्राने कार्यालयाकडील उपलब्ध कागदपत्रे पाहणेकामी उपस्थित राहणेबाबत कळविले आहे. तसेच दि.१४.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जास दि. २२.११.२०२२ रोजीच्या पत्राने हव्या असलेल्या माहितीबाबत अवलोकन करणेकामी उपस्थित राहणेबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिल अर्जांवर सुनावणी घेवून पुन्हा एकदा कार्यालयात उपलब्ध असलेल्या संबंधित विषयाच्या संचिका अपिलार्थी यांना अवलोकनार्थ उपलब्ध करून द्याव्या, असा आदेश पारित केला आहे. प्रथम अपील आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असल्याचे अभिलेख आढळून येत नाही. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कराड, जि. सातारा यांनी आयोग आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत एक दिवस निश्चित करून अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या दोन्ही माहिती अर्जातील विषयांशी संबंधित अभिलेख अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावेत. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली २५ पृष्ठये माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामुल्य पुरवावी. अपिलार्थी यांना २५ पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास शुल्क आकारून पुरवावी. त्याबाबत त्यांचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय कराड, जि. सातारा यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८७४ / २०२४ / सातारा 10835 दिनांक - 11/12/25